लोकमत

'दयानंद'मध्ये कार्यशाळा : महाविद्यालयीन निवडणुकीसाठी आदर्श आचार संहिता

# राजकीय, संघटनांचा हस्तक्षेप राहणार नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**लातूर :** नव्या विद्यापीठ कायद्यानुसार महाविद्यालयात निवडणुका होणार असून, त्यासाठी आदर्श आचारसंहिता असणार आहे. त्यात राजकीय अथवा कोणत्याही विद्यार्थी संघटनांचा हस्तक्षेप राहणार नाही, अशी माहिती कार्यशाळेत देण्यात आली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा तीर्थ विद्यापीठ आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी परिषद निवडणुकीसंदर्भात शुक्रवारी कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रमेश बियाणी होते. मंचावर संयुक्त सचिव सुरेश जैन, प्रमुख मार्गदर्शक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. ज्ञानोबा मुंढे, उपप्राचार्य डॉ. एस.पी. गायकवाड उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन म्हणाले, विद्यार्थी परिषद निवडणुकीतून प्रत्येक महाविद्यालयातून पाच विद्यार्थी प्रतिनिधी निवडले जाणार आहेत. यामध्ये अध्यक्ष, सचिव, विद्यार्थीनी प्रतिनिधी आणि राखीव संवर्गातून एक विद्यार्थी प्रतिनिधी निवडला जाणार आहे. त्याशिवाय, एनएसएस, एनसीसी, क्रीडा, सांस्कृतिक विभागातून प्रत्येकी एक प्रतिनिधीचे नामनिर्देशन केले जाणार आहे. तसेच निवडणुकीचे वेळापत्रक कर्मचारी-विद्यार्थी यांचे कार्य, निवडणुकीची नियमावली, विद्यार्थी उमेदवाराची पात्रता, अर्हता, आचार संहिता, अनुमोदक व सुचक या संदर्भातही माहिती दिली. दरम्यान, डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी वेळापत्रकाचे पालन व नियोजन सांगितले. अध्यक्षीय समारोप रमेश बियाणी यांनी केला. सूत्रसंचालन प्रा.डॉ. सुभाष कदम यांनी केले. आभार प्रा.नितीन डोके यांनी मानले. यावेळी प्राचार्य, प्रतिनिधी उपस्थित होते.



दयानंद कला महाविद्यालयात विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यशाळेत बोलताना डॉ. ज्ञानोबा मुंढे. मंचावर प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, संस्थेचे सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, डॉ. एस.पी. गायकवाड.

## पॅनल उभे करता येणार नाही...

- या निवडणुकीत विद्यार्थी संघटनांना पॅनल उभा करता येणार नाही. शिवाय, निवडणूक कालावधीत महाविद्यालय परिसरात विद्यार्थी व्यतिरिक्त संघटनांना निर्बंध घातले जातील, असेही कायद्यात असल्याचे डॉ. बिसेन यांनी सांगितले.
- महाविद्यालयातील निवडणुकीसाठी प्राचार्य निवडणूक निर्णय अधिकारी नेमतील. कोणत्याही तक्रारी संदर्भात प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

- उमेदवारांच्या प्रचारासाठी महाविद्यालयात दर्शनी भागात भित्तीपत्रकासाठी जागा राखून देणार
- महाविद्यालय परिसर अथवा बाहेर मेळावे, वाहनांवर प्रचार करता येणार नाही.
- खर्चासाठी वर्ग प्रतिनिधीला एक हजार तर अध्यक्षपदासाठी पाच हजार खर्चाची मर्यादा व त्याचा हिशेब द्यावा लागणार.
- एटीकेटी असणाऱ्या विद्यार्थ्यांना निवडणुकीला उभे राहता येणार नाही.
- २५ पेक्षा वय जास्त असणाऱ्यांना उभे राहता येणार नाही.
- सर्व महाविद्यालयांच्या निवडणुका एकाच दिवशी एकाच वेळी होणार आहेत. निवडणुकीसंदर्भातील कुठलाही गैरप्रकार आढळल्यास कारवाई होणार.

# आदर्श महाविद्यालयात विद्यार्थी निवडणुक कार्यशाळा

***प्रतिनिधी/*** २५ जुलै

**हिंगोली :** येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि आदर्श महाविद्यालय, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ९९ नुसार विद्यार्थी परिषद निवडणुक कार्यशाळा हिंगोली, जिल्ह्यातील महाविद्यालयांकरीता आयोजित करण्यात आली होती.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक प्रा.डॉ. ज्ञानोबा मुंडे व शिवाजी महाविद्यालय, परभणीचे उपप्राचार्य प्रा.डॉ.एन. येल्शेट्टी हे उपस्थित होते. तसेच यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही.बी. आघाव व कार्यशाळेचे समन्वयक डॉ. पी.डी. अचोले उपस्थित होते. महाविद्यालयीन युवकांमध्ये लोकशाही मुल्य रुजवून त्यांच्यात नेतृत्व गुणाचा विकास होण्याच्या उद्देशाने होवू घातलेल्या विद्यार्थी परिषद निवडणुक २०१९ प्रक्रियेच्या अनुषंगाने निवडणुक प्रक्रिया, आचार संहीता, तक्रार निवारण व निवडणुकीच्या अनुषंगाने करावयाची महाविद्यालय स्तरावरील कार्यवाही बाबत उपस्थित जिल्ह्यातील सहभागी झालेल्या प्राचार्य, उपप्राचार्य व निवडणुक समन्वयकांना उदबोधीत करण्यात आले.

या कार्यशाळेस हिंगोली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाच्या प्राचार्य, उपप्राचार्य व महाविद्यालयीन निवडणुक अधिकाऱ्यांनी उपस्थिती नोंदवीली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. एस.एल.पत्की, प्रास्ताविक डॉ. पी.डी. अचोले तर आभार प्रदर्शन डॉ. बी.बी. लक्षटे यांनी पार पाडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महा-विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

ePaper देशोन्नती Fri, 26 July 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/41827188

# सक्षम लोकशाहीसाठी विद्यार्थी संसद निवडणूका आवश्यक

## विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यशाळा ; संचालक डॉ. ज्ञानोबा मुंढे यांचे प्रतिपादन

**जिल्हा प्रतिनिधी / २३ जुलै**

**परभणी : यावर्षीपासून महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीच्या माध्यमातून युवा मतदारांमध्ये निवडणूक आणि लोकशाही विषयी जाणीव जागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे. सक्षम लोकशाहीसाठी विद्यार्थी संसद निवडणूक महत्वपूर्ण दुवा ठरणार असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी केले.**

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित एक दिवशीय विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यशाळेत डॉ. मुंढे हे बोलत होते. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशेट्टी उपस्थित होते. कार्यशाळेला मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव म्हणाले कि, विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका ह्या विद्यापीठ कायद्यानुसार व्हाव्यात जेणेकरून निवडणुका ह्या पारदर्शक, तणावमुक्त आणि भयमुक्त होतील. ह्या निवडणुका तब्बल २५ वर्षानंतर होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आहे. जिल्हाभरातील विविध महाविद्यालयाची प्राचार्य व प्रतिनिधी कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेचे संचलन प्रा. प्रल्हाद भोपे यांनी केले.



**परभणी : शिवाजी महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यशाळेत मार्गदर्शन करताना संचालक डॉ. ज्ञानोबा मुंढे, मंचावर प्राचार्य डॉ. बी. यु. जाधव, उप प्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी व इतर.**

रियाज हे करीत आहेत.

रासरा गाठला. त्यामुळ नालआड्यांना पूर येवून पुराचे पाणी गावात शिरले. बऱ्याच ठिकाणी

**निवडणुकीचे वारे** ▶ **स्वारातीम विद्यापीठात निवडणूक कार्यशाळा**

# तब्बल २५ वर्षानंतर विद्यार्थी परिषद निवडणूक होणार

**नांदेड : प्रतिनिधी**

**तब्बल पंचेविस वर्षानंतर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार यंदाच्या चालू शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी परिषद निवडणुका होणार आहेत.दरम्यान या निमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यशाळा घेण्यात आली.**



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम मागच्याच वर्षी लागू झालेला आहे. पण उशिर झाल्यामुळे विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे यावर्षी पासून या निवडणुका घेण्यात येणार आहेत.विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर तब्बल पंचेविस वर्षानंतर विद्यार्थी परिषद निवडणूका होत आहेत. स्वारातिम विद्यापीठात या निमित्ताने नुकतीच कार्यशाळा घेण्यात आली.या कार्यशाळेस मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई येथील शिक्षण तज्ज्ञ आनंद माणूसकर आणि लातूर येथील प्राचार्य डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आर.एम. मुलाणी, व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हासबे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक ज्ञानोबा मुंडे यांची उपस्थिती होती.

यावेळी उद्घाटनपर मार्गदर्शनामध्ये आपले मत मांडताना कुलगुरू डॉ.उद्धव भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये भरपूर नेतृत्व गुण असतात. या गुणाला संधी मिळावी, या हेतूने नव्या अधिनियमानुसार या निवडणुका पार पडणार आहेत. निवडणुका पारदर्शी, मोकळ्या वातावरणात आणि भयरहित होण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांनी विद्यापीठ कायदा परिनियम व निवडणूक यावर आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, पंचवीस वर्षांनंतर ही निवडणूक होत आहे. ही निवडणूक घेण्याचा मूळ हेतू हा विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव करून देण्यासाठी, सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना वाव मिळण्यासाठी आणि क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांना नाव उंचावण्यासाठी घेण्यात येत आहे. या विद्यार्थी परिषदेचा मुख्य हेतू हा विद्यार्थी विकास हाच आहे. या परिषदेच्या दर तीन महिन्याला बैठकी होणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रमधूनही गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची प्रतिनिधी म्हणून निवड होणार आहे.

या कार्यशाळेस व्यवस्थापन परिषद सदस्य, संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि महाविद्यालयीन प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनाविभागाचे संचालक डॉ.शिवराज बोकडे यांनी मानले.

**एका विद्यार्थ्याला ५ मतदानाचा अधिकार**

एका विद्यार्थ्याला पाच मतदान करण्याचा अधिकार असणार आहे. त्यामध्ये एक वर्ग प्रतिनिधी, दुसरा अध्यक्ष, तिसरा सचिव, चौथा महिला प्रतिनिधी आणि पाचवा मागासवर्गीय प्रतिनिधी असणार आहे. वर्ग प्रतिनिधी सोडून इत्तर चार पदे महाविद्यालयातून निवडून द्यावयाची आहेत. यानंतर विद्यापीठ स्तरावर पसंती क्रमाने या चार विद्यापीठ परिषद गठीत करण्यात येणार आहे. संपूर्ण विषयात उत्तीर्ण असलेलाच विद्यार्थी निवडणुक लढवू शकेल.एटीकेटी विद्यार्थ्यार्ला निवडणूक लढविता येणार नाही. उमेदवाराचे वय ३० सप्टेंबरला २५ वर्षाक्षा जास्त असता कामा नये. एका उमेदवारास एकापेक्षा जास्त पदाकरिता निवडणूक लढविता येणार नाही.

**राजकीय संघटनाना नो एंन्ट्री**

नियमित पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थीच निवडणुकीला उभा राहू शकतो. राजकीय पक्ष संघटनाना निवडणुकीत सहभागी होता येणार नाही. महाविद्यालयांच्या आवारात मिरवणूक किंवा मेळावे घेता येणार नाहीत. विद्यापीठातर्फे २१ जुलै पर्यंत निवडणूक कार्यक्रम घोषित होणार आहे. ३० सप्टेंबर पूर्वी निवडणूक घेऊन विद्यापीठ विद्यार्थी परिषद करावयाची आहे. सर्व निवडणुका एकाच दिवशी होतील. अशा अनेक नियमावलीसह माणूसकर यांनी उपस्थित प्राचार्य व महाविद्यालयीन प्रतिनिर्धीना मार्गदर्शन केले.